# 'मेट्रो ३'चे सीएसएमटीपर्यंत भुयारीकरण पूर्ण



लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ या 'मेट्रो ३' च्या कफ परेड ते सीएसएमटी पॅकेज १ मार्गाचे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. एकूण ४०५ रिंगच्या साहाय्याने १४९ दिवसांत या भुयारीकरणाचा ३८ वा टप्पा पार पडला. या भुयारीकरणासह 'मेट्रो ३' च्या सात टप्प्यांपैकी सहा टप्प्यांचे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसीएल) अधिकाऱ्यांनी दिली.

कुलाबा ते सीप्झदरम्यान अनेक ऐतिहासिक वारसा इमारती आहेत. या मेट्रो मार्गिकेजवळ समुद्र आहे. त्यामुळे त्याचे काम करणे जिकिरीचे होते. सूर्या १ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल मोड हार्ड रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हुतात्मा चौक ते सीएसएमटी अप लाइनचे ५५७ मीटरचे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. यासह 'मेट्रो ३'चे कफ परेड ते सीएसएमटीपर्यंतच्या पॅकेज १ चे अप आणि डाऊन मार्गिकेचे मिळून ५.८ कि.मी. अंतराच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. 'पॅकेज-१'अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. आतापर्यंत या 'पॅकेज-१'अंतर्गत भुयारीकरणाचे सातही टप्पे पूर्ण झाले आहेत. या कामासह 'मेट्रो ३'चे ५२ किलोमीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे, असे एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सद्यःस्थितीत 'मेट्रो ३'चे ७९ टक्के स्थापत्य काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सध्या मेट्रो स्थानके, रूळ, फलाट यांची कामे सुरू आहेत. दरम्यान ऐतिहासिक वारसा इमारती, समुद्रानजीक भुयारीकरण करणे जिकिरीचे होते. ऐतिहासिक वारसा इमारतीजवळून भुयारीकरण करताना सर्व सुरक्षेविषयी दक्षता घेऊन 'पॅकेज-१'चे आतापर्यंत १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले, असे 'एमएमआरसी'चे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी सांगितले.

## 'पॅकेज ३'चे ७२ टक्के भुयारीकरण पूर्ण

दरम्यान, वरळी ते मुंबई सेंट्रल स्थानकादरम्यानचे 'पॅकेज ३'च्या भुयारीकरणाचे काम सध्या सुरू आहे. वरळी नाका, नेहरू विज्ञान केंद्र, महालक्ष्मी, मुंबई सेंट्रल स्थानक असा या टप्प्याचा मार्ग आहे. रॉबिन्स मेड तानसा या टीबीएम मशिन्सद्वारे या भुयारीकरणाचे काम सुरू आहे. या 'पॅकेज ३'च्या भुयारीकरणाचे ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे.